महाराष्ट्र पोलीस दलातील विविध वाहतुक शाखांकरिता २१४४ पदे निर्माण करण्यास त्यानुषंगिक येणाऱ्या आवर्ती खर्चास मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीटीई-३६१९/प्र.क्र.०९/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/४४/मनुष्यबळ-आकृतीबंध/२६-ब/१२-अ/२०१४, दि.२३.०१.२०१९, दि.२७.०३.२०१९ व दि.१६.०४.२०१९.
२) मा.उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक ०८.०७.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ४ थ्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी उपरोक्त संदर्भाधीन क्र.०१ येथील पत्रान्वये रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा ठरणारी,अनधिकृतपणे सोडून दिलेली/बेवारस वाहने हटविण्यासंदर्भात तसेच,राज्यातील वाढत्या वाहतूक समस्येवर उपाययोजना करण्याकरिता व मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र.९२/२०१३ मध्ये दिलेले आदेश विचारात घेता, महाराष्ट्र पोलीस दलातील वाहतुक शाखा या घटकासांठी पहिल्या टप्प्यातील आवश्यक पोलीस अधीक्षक-३, पोलीस उप अधीक्षक-६, पोलीस निरीक्षक-२७, सहायक पोलीस निरीक्षक-६३, पोलीस उप निरीक्षक-१०८, सहायक पोलीस उप निरीक्षक-१२६, पोलीस हवालदार-३७९, पोलीस शिपाई-११४३, चालक पोलीस शिपाई-२८९ अशी एकूण २१४४ पदे निर्माण करण्याचा व सदर पदांच्या वेतनासाठी येणा-या आवर्ती खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेने उच्चस्तरीय सचिव समितीपुढे सादर करण्यात आला. याअनुषंगाने मा.उच्चस्तर सचिव समितीने दिनांक ०८.०७.२०१९ रोजी झालेल्या ४ थ्या बैठकीमध्ये महाराष्ट्र पोलीस दलातील वाहतुक शाखांकरिता २१४४ पदे निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

महाराष्ट्र पोलीस दलातील विविध वाहतुक शाखांकरिता २१४४ पदे निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र पोलीस दलातील विविध वाहतुक शाखांकरिता खालील तक्त्यात नमूद संवर्गातील २१४४ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी	पदसंख्या
१.	पोलीस अधीक्षक	S-२३ - ६७७००-२०८७००	०३
२.	पोलीस उप अधीक्षक	S-२० - ५६१००-१७७५००	०६
३.	पोलीस निरीक्षक	S-१८ - ४९१००-१५५८००	२७
४.	सहायक पोलीस निरीक्षक	S-१५ - ४१८००-१३२३००	६३
५.	पोलीस उप निरीक्षक	S-१४ - ३८६००-१२२८००	१०८
६.	सहायक पोलीस उप निरीक्षक	S-१० - २९२००-९२३००	१२६
७.	पोलीस हवालदार	S-९ - २६४००-८३६००	३७९
८.	पोलीस शिपाई	S-७ - २१७००-६९१००	११४३
९.	चालक पोलीस शिपाई	S-७ - २१७००-६९१००	२८९
		एकुण पदे -	२१४४

उपरोक्त तक्त्यात नमूद केलेल्या पदांचे महाराष्ट्र पोलीस दलातील विविध वाहतुक शाखांकरिता वाटप करण्याबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेली पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची पदे त्यासाठी केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार भरण्यात यावीत.

४. सदर नवनिर्मित २१४४ पदांसाठी येणारा आवर्ती खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४४२/आपुक, दिनांक ०९.०९.२०१९ अन्वये वित्त विभागाने तसेच मा.उच्चस्तर सचिव समितीने दि.०८.०७.२०१९ रोजीच्या बैठकीमध्ये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१७५४०१८५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dinesh
Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.09.17 18:04:05 +05'30'

(दिनेश आ. सस्ते)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
२. मा.राज्यमंत्री,गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
३. मा.राज्यमंत्री,गृह (ग्रामीण) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
९. अपर पोलीस महासंचालक(महामार्ग वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१०.प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.उप सचिव(पोल-१अ/पोल५अ/पोल५ब/पोल ८/),गृह विभाग,मंत्रालय,मुंबई
१२. अधिदान व लेखा अधिकारी,मुंबई.
१३.जिल्हा कोषागार अधिकारी,मुंबई.
१४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी,वांद्रे,मुंबई.
१५.वित्त विभाग (व्यय-७)/वित्तिय सुधारणा-१/आ.पु.क.
१६. निवड नस्ती, पोल-३.